क्र. १६० पहिले वर्ष

# रविवारची उपासना

२७ ऑगस्ट २०२३

## सामान्यकाळातील एकविसावा रविवार

### प्रस्तावना

विश्वास म्हणजे आपले जीवन उभे करण्याचा एक महत्त्वाचा स्तंभ आहे. ज्यावर उभारलेलं जीवन कदापि कोलमडू शकत नाही. शिमोन पेत्राने ख्रिस्त, आपला गुरू ह्यावर इतका गाढ विश्वास दर्शविला की, आपल्या ख्रिस्तमंडळाची धुरा वाहण्याचं महत्त्वाचं काम ख्रिस्तानं पेत्रावर सोपवलं. पृथ्वीवरील सर्व अधिकार त्याला बहाल केले. ख्रिस्तमंडळाचा भक्कम पाया म्हणून ख्रिस्ताने पेत्राची निवड केली. आजही परमेश्वर आपल्याकडून गाढ विश्वासाची अपेक्षा करतो. विश्वासाने देवाकडे पाहणारा माणूस ख्रिस्तमंडळाचा खरा प्रेषित असतो. देवाच्या राज्याची सुवार्ता घोषविणारा असतो. आपल्या प्रत्येकाच्या वृत्तीतून, आचारविचारातून ख्रिस्ती विश्वास प्रकट व्हावा व आपण ख्रिस्ताचे खरे अनुयायी बनावे म्हणून ह्या मिस्साबलीत विशेष प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे सर्वसमर्थ पित्या, या बदलत्या काळात शाश्वत आनंद देणाऱ्या मूल्यांची जोपासना करण्यास आम्हाला साहाय्य कर. आम्हामध्ये विचाराचे व भावनेचे ऐक्य निर्माण कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

प्रभूशब्द विधी

### पहिले वाचन

**यशया या पुस्तकातून घेतलेले वाचन** २२:१९–२३

**''दाविदच्या घराण्याची किल्ली मी त्याच्या खांद्यावर ठेवीन.''**

सेनाधीश प्रभू परमेश्वर राजमहालातील व्यवस्थापक शेबाना ह्यास म्हणतो, ''मी तुला हुद्यावरून काढून टाकीन आणि तुझ्या पदावरून खाली ओढीन. त्या समयी असे होईल की माझा सेवक, हिल्कीयाचा पुत्र एल्याकीन, यास मी बोलावीन. त्याला तुझा झगा घालीन. त्याला तुझा कमरबंद करीन. तुझी सत्ता त्याच्या हाती देईन. तो यरुशलेमकरांचा आणि यहुदांच्या घराण्याचा पिता होईल. दाविदच्या घराण्याची किल्ली त्याच्या हातात ठेवीन. त्याने उघडले तर कोणी बंद करणार नाही, त्याने बंद केले तर कोणी उघडणार नाही. मजबूत ठिकाणच्या खुंटीसारखे मी त्याला स्थिर करीन म्हणजे तो आपल्या पित्याच्या घराण्यास वैभवशाली आसन होईल.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**३७:१–२अबक–३,६,८बक**

प्रतिसाद : **हे परमेश्वरा, तुझी दया सनातन आहे.**

१. मी अगदी मनापासून तुझे उपकारस्मरण करीन. देवदूतांच्या समक्ष तुझी स्तोत्रे गाईन. तुझ्या पवित्र मंदिराकडे वळून मी तुझी उपासना करीन.

२. तुझ्या दयेमुळे आणि तुझ्या सत्यामुळे मी तुझ्या नामाचे उपकारस्मरण करीन. कारण तू आपल्या संपूर्ण नामाहून आपल्या वचनाची थोरवी वाढविली आहेस. मी धावा केला तो तू त्याच दिवशी ऐकला, तू मला हिम्मत दिलीस तेव्हा माझ्या जिवाला सामर्थ्य प्राप्त झाले.

३. परमेश्वर थोर आहे तरी तो नम्रजनांकडे लक्ष देतो. पण गर्विष्ठाला दुरून ओळखतो. हे परमेश्वरा, तुझी दया सनातन आहे. तू आपल्या हातचे काम सोडू नकोस.

### दुसरे वाचन

**पौलचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन** ११:३३–३६

**''सर्व काही त्याच्यापासून, त्याच्याचद्वारे आणि त्याच्याच प्रीत्यर्थ आहे.''**

अहाहा, देवाच्या बुध्दीची आणि ज्ञानाची संपत्ती किती अगाध आहे! त्याचे निर्णय किती गहन आणि त्याचे मार्ग किती अगम्य आहेत!

''प्रभूचे मन कोणी ओळखले
आणि त्याचा मंत्री कोण होता?''

''त्याला प्रथम देऊन त्याची फेड करुन घेईल असा कोण आहे?'' कारण सर्व काही त्याच्याचपासून, त्याच्याचद्वारे आणि त्याच्याच प्रीत्यर्थ आहे. त्याला युगानुयुग गौरव असो. आमेन.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**इफिस.१:१७–१८**

**आलेलुया, आलेलुया!**

आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याचा पिता हा आमचे अंत:चक्षू प्रकाशित करो,
म्हणजे त्याच्या पाचारणामुळे निर्माण होणारी,
आशा कोणती ही आम्ही ओळखावी.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन** १६:१३–२०

**''तू पेत्र आहेस आणि मी तुला स्वर्गराज्याच्या किल्ल्या देईन.''**

फिलिप्पाच्या कैसरीयाकडच्या भागात गेल्यावर येशूने आपल्या शिष्यांना विचारले, ''मनुष्याच्या पुत्राला लोक कोण म्हणून म्हणतात?'' ते म्हणाले, ''कित्येक बाप्तिस्मा करणारा योहान, कित्येक एलिया, कित्येक यिर्मया किंवा संदेष्ट्यातील कोणी एक असे म्हणतात.'' तो त्यांना म्हणाला, ''पण तुम्ही मला कोण म्हणून म्हणता? शिमोन पेत्रने उत्तर दिले आपण ख्रिस्त, जिवंत देवाचे पुत्र

आहा. येशूने त्याला म्हटले, शिमोन बायोना, धन्य तुझी! कारण मांस आणि रक्त यांनी नव्हे तर माझ्या स्वर्गातील पित्याने हे तुला प्रगट केले आहे. आणखी मी तुला सांगतो, तू पेत्र आहेस आणि ह्या खडकावर मी आपली मंडळी रचीन आणि तिच्यापुढे नरकाची कोणतीही शक्ती चालणार नाही. मी तुला स्वर्गराज्याच्या किल्ल्या देईन आणि पृथ्वीवर जे काही तू बांधशील ते स्वर्गात बांधले जाईल आणि पृथ्वीवर जे काही मोकळे करशील ते स्वर्गात मोकळे केले जाईल. तेव्हा त्याने शिष्यांस निक्षून सांगितले मी ख्रिस्त आहे हे कोणालाही सांगू नका.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रस्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे याचना करू या.

प्रतिसाद : **कर दानाचा वर्षाव देवा, वरदानाचा वर्षाव.**

१. आपले पोप, ख्रिस्तसभेतील सर्व बिशप्स, फादर्स, सिस्टर्स व प्रापंचिक यांना प्रभूचा आशीर्वाद लाभावा म्हणून आपण प्रभूची प्रार्थना करू या.

२. युवकापुढे बेकारी, गरीबी, स्पर्धा, भ्रष्टाचार अशा अनेक समस्या आहेत. यांचा सामना करताना त्यांनी ख्रिस्ती तत्त्वे आणि मूल्ये यांचा अवलंब करावा म्हणून प्रभूची प्रार्थना करूया.

३. जे लोक दारू गाळतात आणि इतरांच्या जीवनाची हानी करतात अशांना जीवनोपयोगी धंदा शोधण्यास परमेश्वराने सुबुध्दी द्यावी म्हणून आपण प्रभूची प्रार्थना करूया.

४. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

## समारोप

हे सर्वसमर्थ पित्या, तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या प्रेरणेमुळे श्रध्देने आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो त्यांचा तू स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे दयाळू परमेश्वरा, येशू ख्रिस्ताच्या परिपूर्ण समर्पणामुळे आम्ही तुझे प्रजाजन बनलो. तुझ्या आम्हावरील प्रीतीमुळे तुझ्या ख्रिस्तसभेला शांती व ऐक्य ह्यांचे वरदान दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, या ख्रिस्तप्रसादाने तुझ्या आरोग्यदायी कृपाशक्तीची आम्हामध्ये वाढ कर. सर्व गोष्टीत तुला संतुष्ट करण्यासाठी या ख्रिस्तप्रसादाकडून आपल्या सर्व प्रयत्नांत आम्हांला मार्गदर्शन कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## चिंतन

आजच्या शास्त्रवाचनातील (यशया २२:१९-२३; रोम.११:३३-३६; मत्तय १६:१३-२०) सगळ्यात महत्त्वाचा शब्द आहे किल्ली! आजच्या पहिल्या वाचनात दाविदच्या घराण्याची किल्ली एल्याकीमला देऊन त्याला त्याच्या घराण्यावर पूर्णपणे अधिकार देण्याचे वचन परमेश्वर देतो. दुसऱ्या वाचनात (रोम.११:३३-३६) मात्र संत पौल रोमकरांना परमेश्वराकडे अगाध बुध्दीचे आणि संपत्तीचे भांडार आहे ह्याची जाणीव करून देतो. हा खजिना उघडण्यासाठी प्रार्थना व मनन-चिंतन ह्यांची किल्ली माणसाकडे असायला हवी. शुभवर्तमानामध्ये प्रभू येशू पेत्राला स्वर्गाच्या किल्ल्या देण्याचे अभिवचन देतो. त्यापूर्वी विचारलेल्या प्रश्नांमध्ये एक ज्ञानाची किल्ली व दुसरी अनुभवाची किल्ली दडलेली आहे.

प्रभू येशूची खरी ओळख करून घेण्यासाठी ज्ञानाची किल्ली (लोक मला कोण म्हणून म्हणतात या प्रश्नाचे उत्तर) पुरेशी नाही. त्यासाठी अनुभवाची किल्ली (तुम्ही मला कोण म्हणून म्हणता ह्या प्रश्नाचे उत्तर) जवळ असणे गरजेचे आहे. ईशज्ञान आणि आध्यात्मिक अनुभव ह्या दोन किल्ल्या परस्परपूरक आहेत. कारण अभ्यासाविना अध्यात्म हे सांगाड्याविना असलेल्या मांसाच्या गोळ्यासमान असते तर अध्यात्माविना कोरडा अभ्यास हा मांसाविना असलेल्या शुष्क सांगाड्यासारखा असतो. पेत्राठायी पुढे ह्या दोन्ही गोष्टींचा संगम घडून आला. त्याला देण्यात आलेल्या दुहेरी अधिकाराचे चिन्ह म्हणून आजही त्याचे वारस असलेल्या पोप महोदयाच्या बोधचिन्हामध्ये दोन किल्ल्यांचा समावेश करण्यात येतो. सोनेरी रंगाची किल्ली त्यांच्या स्वर्गातील अधिकाराचे व रूपेरी/चंदेरी रंगाची किल्ली हे त्यांच्या पृथ्वीवरील अधिकाराचे चिन्ह होय.

**आत्मपरीक्षण :** श्रध्देमध्ये वाढण्यासाठी मला ईशज्ञान आणि ईश्वर अनुभव (अध्यात्म, अभ्यास) ह्या दोन किल्ल्यांचा वापर कशाप्रकारे करता येईल?

●●●

| ऑगस्ट/सप्टेंबर २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | पहिला सप्ताह |
|---|---|---|
| सोम २८ | सं अगस्टीन (पां) | : १ थेस्सलनी १:२-५, ८-१०/मत्तय २३:१३-२२ |
| मंगळ २९ | सं योहान बाप्तिस्ताचा शिरच्छेद (तां) | : १ थेस्सलनी २:१-८/मत्तय २३:२३-२६ |
| बुध ३० | सं जीन जुगन (हि) | : १ थेस्सलनी २:९-१३/मत्तय २३:२७-३२ |
| गुरू ३१ | सं अरिस्टाइड्स (हि) | : १ थेस्सलनी ३:७-१३/मत्तय २४:४२-५१ |
| शुक्र ०१ | सं बीआट्रिस (हि) | : १ थेस्सलनी ४:१-८/मत्तय २५:१-१३ |
| शनि ०२ | लिऑनचा सं जुस्टुस (हि) | : १ थेस्सलनी ४:९-१२/मत्तय २५:१४-३० |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)